# नक्षल चळवळीचा उदय व विकास

**प्रा. व्ही. बी. चांदजकर ,** एम. एस. गोटे महाविद्यालय, वाशिम

प्रस्तावना: नक्षलबाडी पश्चिम बंगाल मधील एक गाव आहे. तेथे कानू सन्यालच्या नेतृत्वात भारतीय कम्युनिस्ट पार्टी मार्क्सवादी (सीपीएम) च्या एका वर्गाने २५ मे १९६७ मध्ये विद्रोह सुरू केला. १८ मे १९६७ मध्ये सिलगुडी किसान सभा व भूमीहीन संघटनेने कानू सन्याल यांच्या सशस्त्र लढयाला समर्थन देण्याची घोषणा केली. काही दिवसानंतर नक्षलबाडी गावत एका जमीनीच्या वादासंदर्भात लोकांनी जमीनदारावर हल्ला केला. जेंव्हा २४ मे १९६७ ला पोलिस किसान सभेच्या नेत्याला अटक करण्यासाठी आले तेंव्हा, आदिवासीच्या एका गटाने त्यांच्यावर हल्ला केला. त्यात एक पोलिस निरीक्षक ठार झाला. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ०९ नागरिक व ०२ मुले ठार झाले. या घटनेमुळे आदिवासी व अन्य गरीबांना या आंदोलनात सहभागी होण्याची वा जमीनदाराला विरोध करण्याची प्रेरणा मिळाली. अशा प्रकारे नक्षलबाडी येथून सुरू झालेले एक सशस्त्र आंदोलन म्हणजे नक्षलवाद होय. ज्या ठिकाणी ही घटना घडली, तेथे भाकप (माले)ने स्टॉलिन, लेनिन, माओ, चारू मुजुमदार यांचे फोटो लावलेले होते. पोलिस फायरिंगमध्ये ज्यांचा मृत्यू झाला होता त्यांच्या नावाचा एक स्तंभ उभारलेला आहे. २५ में २०१७ ला नक्षल चळवळीला पन्नास वर्ष पूर्ण झाले आहेत.

माओवादी कम्युनिस्ट सेंटर (mcc) भारतातील दोन सशस्त्र माओवादी संघटने पैकी एक होते. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (माओवादी) याची निर्मिती करण्यासाठी सप्टेंबर २००४ मध्ये या पार्टीचे विलिनीकरण पीपल्स वॉर ग्रुपमध्ये झाले. तसे पाहता एमसीसीची स्थापना १९७५ मध्ये झाली होती. या अगोदर एक गट १९६९ मध्ये निर्माण झाला होता. या गटाने आपली वेगळी ओळख ठेवण्यासाठी व भाकप माले पासून दुर राहण्यासाठी आपला गट स्थापन केला होता. त्याला दक्षिण देश असे उपनाव देण्यात आले होते. या गटाला ट्रेड युनियन कार्यकर्त्यांचे समर्थन प्राप्त होते. अमूल्य सेन व कानाई चटर्जी दक्षिण देश समूहाचे प्रमुख नेता होते. जंगलात ते सशस्त्र काम करत होते. स्थानिक लोकसंख्येपैकी एक मोठा भाग दलित व आदिवासींचा होता. गनिमी युध्दासाठी उपयुक्त मानल्या जाणा-या या भागात त्यांचा मोठा प्रभाव होता. त्यांचे अनेक दस्ते होते ते अन्न-धान्यावर ताबा मिळवत असतं. त्यासाठी ते पोलिस व खब-याची हत्या करीत असत. हा समूह १९७३ पर्यत सक्रीय होता. १९७५ मध्ये या गटाचे नाव कम्युनिस्ट सेंटर असे करण्यात आले. १९७६ मध्ये एमसीसीचा देशाच्या अन्य भागात विस्तार होऊ लागला. त्यातच त्यांनी पूर्व बिहारमध्ये आपली कार्यप्रणाली सुरू करण्यासाठी बंगाल-बिहार स्पेशल एरिया समिती स्थापना केली. १९८२ मध्ये कानाई चटर्जी यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर एमसीसीमध्ये अंतर्गत विरोध वाढत गेला. चटर्जी यांचे उतराधिकारी सिवेजी व त्यांचे सहाय्यक रामाधार सिंह काही तत्त्वावर असहमत होते. सिंह पार्टीपासून विभक्त झाले व ते कानू सन्यालच्या गटात सहभागी झाले.

इ. स. १९८० मध्ये एमसीसीचे नेतृत्व संजय दुसाध व प्रमोद मिश्रा यांनी केले. तो पर्यंत एमसीसीचा प्रभाव बिहारपर्यंत विस्तारीत झाला होता. त्यांचे जवळ जवळ ५०० पूर्णकालीन कार्यकर्ते व १० हजार सदस्य होते. एमसीसीचे अनेक विंग आहेत. ज्यात क्रांतीकारी कमेटी, जनसुरक्षा संघर्ष मंच, क्रांतीकारी बुध्दीजीवी संघ व क्रांतीकारी छात्र लीग सहभागी होते. पार्टीच्या सुरक्षा दलाला लाल सुरक्षा दल म्हटल्या जाते. पीपल्स वॉर ग्रुप एक भूमिगत पार्टी होती. २००४ मध्ये एमसीए सोबत विलीनीकरण झाल्यानंतर ही पार्टी भारतीय कम्युनिस्ट पार्टी (माओवादी) मध्ये सहभागी झाली. यांचा आधार मार्क्सवाद, लेनिनवाद व माओवाद होता. या पार्टीची स्थापना कोंडापल्ली सीतारामय्या व्दारा १०८० मध्ये आंध्र प्रदेशात झाली. त्यामुळे तेलंगणा प्रांतात परत नक्षलवादी सक्रिय झाले होते. पार्टीने सशस्त्र संघर्ष करण्याचा संकल्प करून व निवडणूका लढविण्यास विरोध केला. पार्टी तेलंगणापुरतीच मर्यादीत राहिली. त्यानंतर आंध्र प्रदेश, महाराष्ट्र या भागात तिचा विस्तार झाला. तसेच ती मध्यप्रदेश, ओडिशापर्यंत विस्तारीत होत गेली. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (माओवादी) चे संघटन अनेक गटात विभागलेल्या गटांच्या विलिनिकरणाने झाली. यामध्ये प्रामुख्याने एमसीसी व पीडब्लूजी सहभागी झाली होती. यांचा उद्देश सशस्त्र संघर्ष करून सरकारला पदावरून दूर करण्याचा होता. ही एक भूमिगत संगटना असल्याने सरकारने त्यावर प्रतिबंद लावला. या संघटनेची स्थापना २००४ मध्ये झाली होती. तत्कालीन पीपल्स वॉर ग्रुपचा नेता मुपाला लक्ष्मणराव ऊर्फ गणपतीला पार्टीचा महासचिव बनविण्यात आले होते. ही संघटना मध्य भारतातील छत्तीसगड, आडिशा, बिहार, झारखंड, महाराष्ट्र व पश्चिम बंगालच्या आसपासच्या भागातील मागास जनजातीसाठी लढण्याचा दावा करत असतात. नव्या संघटनात्मक तत्त्वानूसार बिहार, उत्तरप्रदेश, असाम, मणिपूर, महाराष्ट्र, नागालँड, तामीळनाडू व कर्नाटक पर्यंत विस्तार केला आहे. यामागे एक मोठे कारण असे आहे की या भागात नैसर्गिक खनिज संपतीचे मोठे साठे आहेत, तेथे खाजगी कंपन्या कार्यरत आहेत .

आज अनेक नक्षलवादी संघटना स्वीकृत राजकीय पक्ष बनले आहेत. सांसदीय निवडणूकात भाग घेत आहेत. परंतू आज ही अनेक संघटना पडद्याआड संघर्ष करीत आहेत. नक्षलवादाचा सर्वाधिक मार आंध्रप्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, झारखंड आणि बिहार या राज्यांना बसला आहे. २०११ मध्ये नक्षली हिंसेत ६११ लोक मारले गेले, २०१२ मध्ये ४०९ लोक मारले गेले, त्यात ११३ सुरक्षा दलाचे जवान होते व २९६ सामान्य नागरिक होते. २००७ या वर्षावर नजर टाकली असता १००५ ही संख्या होती. सुरक्षा दल व माओवादी यांच्या संघर्षात सर्वाधिक नुकसान सामान्य नागरिकांचे झाले आहे. सामन्य नागरिक हे सुरक्षा दल व नक्षलींच्या निशानावर असतात. माओवादी सुरक्षा दलावर असा आरोप लावतात की नक्षली समजून ते आदिवासींना मारतात तर सुरक्षा दल नक्षलवाद्यावर असा आरोप लावतात की ते पोलिस खबरी समजून ते सामान्य नागरिकांना नाहक मारत असतात.

२५ मे २०१३ मध्ये छत्तीसगड राज्याच्या सुकामा जिल्हयात कॉग्रेसच्या परिवर्तन यात्रेवर नक्षलवाद्यांनी हल्ला करून २७ लोकांना ठार केले होते. तेंव्हा केंद्र सरकाराने हे मान्य केले होते की, नक्षलवाद देशासमोरील सर्वात मोठी समस्या आहे. मीडियाच्या माध्यमातून असे विचार बाहेर येत होते की थल सेना, वायू सेना यांच्या मदतीने नक्षलवाद संपूष्टात आणावा . तर काहींच्या मते नक्षली नेत्यासोबत चर्चा करून नक्षलवाद संपूष्टात आणावा. या शिवाय चर्चा अशी सुध्दा होत आहे की आदिवासीवरील अन्याय, अत्याचार त्यांच्या संसाधनाची लूट कॉरपोरेट करत असल्यामुळे मूळ समस्या गंभीर होत चाललेली आहे. नक्षली समस्या आदिवासी सोबत जोडलेली आहे. त्यामुळे आदिवासीला बाजूला सरकून ही समस्या सुटनार नाही. त्यामुळे देशासमोरील सर्वात मोठी समस्या नक्षली आहेत की आदिवासी हे अगोदर निश्चित करावे लागणार आहे. हे ही समजने आवश्यक आहे की नैसर्गिक संसाधानासाठी आदिवासी आपले अधिकार प्राप्त करण्यासाठी मागील ३०० वर्षापासून संघर्ष करीत आहेत. नक्षलवादी केवळ मागील चार दशकापासून आले आहेत. आदिवासी योध्दा तिलका मांझी यांनी इंग्रजांना असे सांगितले होते की जंगल व जमीन ही ईश्ववराने आम्हाला दिलेली आहे, तेंव्हा आम्ही सरकाराला राजस्व का द्यायचे. परंतु इंग्रज सरकारने त्याचे म्हणने ऐकले नव्हते. त्यामुळे इंग्रज व आदिवासीमध्ये संघर्ष सुरू झाला. १३ जानेवारी १७८४ ला तिलका मांझी यांनी भागलपूरचे जिल्हाधिकारी ऑगस्ट क्लीवलँड यांची हत्या केली. त्या बदल्यात इंग्रजांनी अनेक आदिवासींची हत्या केल्या होत्या. शेवटी इग्रजांनी तिलका मांझी याला पकडून हजारो लोकांसमोर फाशी देण्यात आली. परंतु आदिवासी इंग्रजांना घाबरले नाही. इंग्रजा विरूध्द ते संघर्ष करीत राहिले. त्यात संताल, कोल्ह विद्रोह, बिरसा उलगुलान प्रामुख्याने होते. त्यानंतर मात्र इंग्रजांना आदिवासी भूभाग ताब्यात घेता आला नाही. इंग्रजांना आदिवासींची जमीन, पारंपरिक शासनव्यवस्था आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी कायदे बनवावे लागले होते.परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंर भारत सरकारने या पासून कोणताच धडा घेतला नाही. आदिवासींच्या बाजू समजून घेणे दूरच राहिले, आदिवासींना भारताचे नागरिक बनविले. परंतु आदिवासींनी आपल्या भूप्रदेशालाच देशाचा दर्जा देत राहिले. त्यात संथाल, मुंडा दिशुम इत्यादी. स्वातंत्र्यानंतर प्रत्येक वेळी असे सांगितले गेले की, आदिवासींना समाज प्रवाहाच्या मुख्य धारेत आणायचे आहे. कारण देशातील बहूसंख्य जनता जंगली, निरक्षर व असभ्य आदिवासीसोबत व्यवहार व कोणताही संबंध ठेवण्यास तयार नव्हते. आता हेच लोक आदिवासींना नक्षली समजू लागले आहेत. आदिवासींना मुख्यधारेत

आणण्याच्या नावावर त्यांची संस्कृती, भाषा, परंपरा व त्यांच्या संसाधनापासून त्यांना दूर केले जात आहे. आदिवासी आपली पारंपरिक सभ्यता वाचविण्यासाठी स्वत:च नक्षलवादाकडे वळले आहेत. कारण त्यांना असे वाटत आहे की, आधुनिक शस्त्रांनी लेस भारतीय सैन्याचा आपण मुकाबला करू शकणार नाहीत.

नक्षलवादाचा उगम जमीनदाराच्या शोषणातून झाला आहे. जे जमीन कसतील तेच त्याचे मालक असतील. म्हणजे भूमिसुधार हा त्यांचा केंद्रबिंदू होता. स्वातंत्र्यत्तोर काळात भूमी सुधारणा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु आजच्या तारखेला सरकार व नक्षलवादी यांच्या एजेंडयामधून हे शब्द हद्दपार झाले आहेत. आता दोघांची नजर नैसर्गिक खनिज संपत्तीकडे लागली आहे.

तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी २००९ मध्ये असे सांगितले होते की, खनिज संपत्तीने सधन असा नक्षल प्रभावित भाग आहे. नक्षलवादाच्या विस्तारामुळे औद्योगिक गुंतवणूकीला अडथळा निर्माण झाला आहे. १९९० च्या दशकात नक्षलवाद दलितापर्यंतच सीमीत होता. कारण उच्चजातीचे लोक दलितावर अमानवी अत्याचार कारीत होते. परंतु उदारीकरणानंतर मात्र विदेशी भांडवली गुंतवणूक वाढत गेली. नक्षलवाद दलितांच्या वस्तीमधून बाहेर पडून आदिवासींच्या गावात पोहचला.याच दरम्यान छत्तीसगड व झारखंड राज्याची स्थापना झाली. या राज्यात देशातील सर्वाधिक खनिजाचे साठे आहेत. या राज्यातील सरकाराने औद्योगिकरणासाठी उदारीकरन स्वीकारले असल्याने औद्योगिकरण आदिवासीच्या विनाशाचे कारण बनत गेले. आदिवासी औद्योगिकरणाला विरोध करू लागले, परंतु राज्य सरकारने त्याकडे लक्ष्य दिले नाही. सन २०१२ मध्ये झारखंड सरकारने औद्योगिकरणासाठी २० ते २५ कि. मी. पर्यंतची जमीन अधिग्रहन करून उद्योग उभारण्याचा प्रस्ताव दिला होता. या भागातील आदिवासी कोठे जाणार होते, या बाबत निश्चित धोरण ठरविलेले नव्हते.

झारखंड, छत्तीसगड आणि ओडिशा राज्याला नक्षलवादामुळे आदिवासी समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. झारखंडमध्ये ०६ हजार आदिवासींना नक्षली समजून वेगवेगळया आरोपाखाली तुरूंगात ठेवले आहे. छत्तीसगडमध्ये ०२ हजार आणि ओडिशामध्ये ०२ हजार लोक तुरूंगात आहेत. १००० लोक चकमकीत ठार झाले आहेत, १००० लोक पोलिस खबरी असल्याच्या संशयावरून नक्षलवाद्यांनी ठार केले आहेत. हजारोच्या संख्येने नक्षलवाद्यांनी सामान्य आदिवासींना ठार केले आहे. एकूणच दोन्ही बाजूंनी आदिवासींचा जीव गेलेला आहे, त्यांचे जीवन उध्वस्त झाले आहे. याशिवाय बंदुकीच्या जोरावर नक्षलवादी जेवण व आश्रय घेत असतात. नक्षलवाद्यांना आश्रय देणा-या आदिवासीवर सुरक्षा दल अत्याचार करीत असतात. परंतु आपला व्यापार चालविण्यासाठी उद्योगपती नक्षलवाद्यांना खंडणी देत असतात. त्यावर सरकार कोणतीही कारवाई करतांना दिसत नाही.

देशात आदिवासींच्या संविधानिक व पारंपरिक अधिकाराचे उल्लंघन झाले आहे. घटनेची पाचवी अनुसूची राज्यांना लागू नाही. आदिवासींच्या जमीनी वाचविण्यासाठी कायदे बनविण्यात आले नाहीत. हे बिरसा मुंडा व अन्य शहीदांचा अपमान मानला जातो. एवढेच नव्हे तर हा भारतीय संविधान व उच्च न्यायालयाचा अवमान समजला जातो. कारण हा कायदा संविधानाच्या ०९ व्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेला आहे. उच्च न्यायालयाने याला सक्तीने लागू करण्याचा आदेश दिले होते. याशिवाय ट्रायबल प्लॅनचे पैसे दुसरीकडे खर्च केल्या जात आहेत. हे आदिवासींचे हक्क लुटण्यासारखे आहे. आदिवासींच्या या परिस्थितीला त्यांचे लोकप्रतिनिधी सर्वात जास्त जबाबदार आहेत. त्यांनी कधीही आदिवासींचे प्रश्न विधानसभा व संसदेत प्रामाणिकपणाने मांडले नाहीत. परिणाम स्वरूप नक्षलवाद देशातील सर्वात मोठी समस्या बनत गेली. परंतु आदिवासी मात्र कधीही देशातील सर्वात मोठी समस्या बनले नाहीत. उलट आदिवासींना समाजाच्या मुख्यधारेची समस्या मानली आहे. कारण ते नैसर्गिक साधन-संपत्ती भांडवलदाराकडे देण्यास तयार नाहीत. हीच देशासमोरील सर्वात मोठी समस्या आहे. करोडो रूपये शासन खर्च करीत आहे परंतू आदिवासीच्या परिस्थितीत काहीच फरक नाही. प्रश्न असा आहे की सरकारच्या योजनेचा पैसा कोठे अडकून पडला आहे. कोण लोक आहेत ते आदिवासींना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवत आहेत. या सर्व आधारावर गरीबांना भडकविण्याचे काम लाल विचारसरणी करत आहे. ही एकच गोष्ट नाही तर अशा अनेक गोष्टीमुळे नक्षलवादाची समस्या उद्‌भवली आहे.

मुख्यत: आदिवासींचा जीवनस्तर सुधारण्यासाठी शासनाच्यावतीने शेकडो योजना राबविल्या जात आहेत, जेने करून त्यांचा लोकशाहीवर विश्वास टिकेल. परंतु या योजनेचा लाभ आधी आदिवासींना मिळाला असतातर आज हे लोक नक्षलवाद्यासोबत राहिले नसते. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हयात बांबू व अन्य व्यवसायिक संसाधनाचा कारभार आदिवासी व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून केला जातो. त्यामुळे आदिवासींच्या उत्पन्नात अप्रत्यक्षपणे वाढ झाली आहे. एका बाजूला बस्तर आहे तेथे आज देखील ठेकेदार आदिवासीचे शोषण करीत आहेत. दुस-या बाजूला सरकार नक्षलवाद वाढीची कारणे शोधत आहे. वनाधिकार कायदा या सर्व विसंगती दुर करण्यासाठी २००७ मध्ये बनविण्यात आला होता. परंतु हा कायदा देखील कागदावरच राहिला गेला. बस्तरमधील हिरवे जंगल ज्याला म्हटले जाते तो तेंदूपानाचा व्यवसाय अरोबो रूपयाच्या घरात आहे. या व्यवसायाच्या माध्यमातून ठेकेदार, नक्षली आणि वनाधिकारी मालामाल झाले आहेत. सन २००२ बस्तरमधील लोह खनीजावर केवळ सरकारी संस्था nmdc चा अधिकार होता. परंतु नंतर पाच ते सात वर्षात मोठया कारखानदारांना ८००० हेक्टरमध्ये विस्तारीत खाणी देण्यात आल्या. नारायणपूर मधिल ओरछा, भानुप्रतापपुर हा असा भाग आहे की जेथे सरकारी योजना पोहचण्यास सरकार अयशस्वी ठरले आहे. या भागातील भांडवलदारांना कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता खाणीचे वाटप करण्यात आले. उद्योगासाठी लागणारी जमिन आदिवासीसोबत संघर्षाचे ठरले. अशा संघर्षाला प्रेरणा देण्याचे कार्य नक्षलवादी सतत करीत असतात. त्यामुळे नक्षलवादी आदिवासीचे तारणहार बनले आहे. या पध्दतीने नक्षलींनी येथील सर्वभागावर हळूहळू वर्चस्व प्रस्थापीत केले.

नक्षल प्रभावित जिल्हयासाठी आईपी (इंटीग्रेटेड एक्सन प्लान विंग एक्स्ट्रीमिजम) नावाची योजना सुरू करण्यात आली आहे. बस्तर भागात २०० कोटीपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात आली आहे. परंतु सत्य हे आहे की, नेता, सप्लायर, ठेकेदार व प्रशासकीय अधिकार यांनी मोठे नियोजन करून ही रक्कम लाटली आहे. अनेक घटना उघडकीस आल्या, चौकशी समित्या नेमण्यात आल्या, चौकशी समितीत ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यानांच नियूक्त करण्यात आले, त्यामुळे त्यातले काहीच बाहेर आले नाही. याच प्रकारे मनेरगा, राजीव गांधी शिक्षा मिशन, एकिकृत आदिवासी परियोजना, १३ व्या वित्तआयोगाची अरोबो रूपयाची राशी भ्रष्टाचारात अडकली गेली आहे. ही रक्कम बस्तरमधील प्रत्येक आदिवासीला वाटून दिली असती तर एक एक आदिवासी लक्षाधीश झाला असता. आज आदिवासींना दिली जाणारी विविध योजनाची सामुग्री सरकारी टेबलवर अडकलेली दिसते. ज्यांनी सामान मिळाले म्हणून अंगठयाचे ठसे दिले, त्यांना आज पर्यंत काहीच मिळाले नाही.

आदिवासींच्या संघर्षाचा इतिहास असे सांगतो की, त्यांचा संघर्ष नैसर्गिक साधन संपत्ती वाचविण्यासाठी आहे. मग हा लढा इंग्रजांच्या विरोधात असो अथवा स्वतंत्र भारताच्या शासनाच्या विरोधात असो, आदिवासी हे जाणून आहेत की, निसर्गामध्येच आपले अस्तित्व आहे. त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्ती व स्वत:ला वाचविण्याच्या प्रयत्नात आहेत. छत्तीसगडच्या घटनेवरून आपण हे समजून घ्यायला हवे की, देशाची समस्या गरीबी नाही तर असमानता आहे. नक्षलवादी गरीब नाहीत. त्यांच्या मनात आक्रोश आहे की, शहरात बसलेले नेते, सरकारी अधिकारी त्यांना लुटत आहेत. ऑक्सफॅमच्या एका अहवालानुसार जगातील १०० श्रीमंताची संपत्ती मागील वर्षात तेरा हजार कोटी रूपयांनी वाढली आहे. ही संपत्ती १०० कोटी गरीबांना वाटल्यास प्रत्येक गरीब व्यक्तिला १३२०० रूपये मिळू शकतात. जगभरातील १०० श्रीमंत व्यक्ती व १०० कोटी गरीब एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. याचा अर्थ एका मर्यादा पर्यंत असमानता लाभदायक ठरू शकते. ही मर्यादा ओलांडल्यास ही असमानता अभिशाप बनू शकते. जन आणि प्रतिनिधीच्या मध्ये दुरावा निर्माण होत चाललेला आहे. त्यामुळे शासनाचे लाभ जनतेपर्यंत पोहचणे अशक्य झाले आहे. भारतात अनेक भागात जो नक्षलवाद वाढला आहे, त्यामागे जन व प्रतिनिधी मधील अंतर सांगता येईल. नक्षलवाद्यांनी सुरूवातील स्थानिक लोक व जवानांना लक्ष्य केले होते. त्यानंतर नोकरशाही व नेत्यांना लक्ष्य केले आहे. कारण नोकरशाही व नेता एकत्रित

धोरण निर्माण करीत असतात. नक्षलवादी नेत्यांना असे वाटते की, या दोन्हीवर एकत्रच हल्ला केल्यास स्थिती आणखीणच खराब होऊ शकते. नक्षलवाद्यांना नेमके तेच हवे आहे. या सर्व बाबींचा विचार केल्यास अन्य समस्येपेक्षा नक्षलवादी समस्या आव्हानात्मक आहे.

नक्षलवादी आपले प्रभावक्षेत्र वाढवित आहेत. छत्तीसगड, झारखंड, आंध्रप्रदेश अशा नक्षल प्रभावित राज्यामधून बाहेर पडून हे लोक पंजाब, हरियाना व दिल्ली अशा भागात आले आहेत. अनेक मोठया शैक्षणिक संस्थामध्ये नक्षल्यांनी आपला प्रभाव वाढविला आहे. जेंव्हा नक्षलवाद्यांनी दरभा येथे हल्ला केला तेंव्हा केंद्र सरकार आपले ०९ वर्षातील केलेल्या कार्याचा प्रचार करण्यात व्यस्थ होते. जेंव्हा दुमका नक्षली प्रकरण पुढे आले तेंव्हा झारखंडमध्ये सरकार स्थापन करण्याची शर्यत लागली होती. सरकार सुस्थिर करण्यासाठी या गोष्टी आवश्यक असल्यातरी केद्र व राज्यात समन्वय ठेवणे आवश्यक आहे. नक्षलवादावरून केंद्र व राज्यात खास करून केंद्राचे सरकार राज्यात कार्यरत नसते अशा प्रसंगी दोघांचे भिन्न विचार ऐकवयास मिळतात. त्यामुळे नक्षलवाद विरोधात पूर्ण शक्तीने तोंड देता येत नाही. संबंधित राज्याची सहमती घेण्यासाठी बराच वेळ जातो. त्यामुळे नक्षलवाद्यांना पळून जाण्याची मोठी संधी मिळते. दुस-या बाजूला केंद्रीय सुरक्षा दल व स्थानिक पोलिसांसोबत योग्य समन्वय नाही. त्यामुळे परिस्थितीती अनखीन बिकट होत जाते. गोपनिय माहिती आदान-प्रदानमध्ये ही मोठया अडचणी आहेत. कारण वेगवेगळया तंत्राचे लोक तेथे कार्यकरीत असतात. त्यांच्यात समन्वयाचा अभाव आहे. नक्षलवाद निर्मूलनासाठी मागास वर्गांना आर्थिक अधिकार द्यावे लागणार आहेत व नक्षलींच्या समुळ भागावर हल्ला करावा लागणार आहे.

नक्षलवादा संदर्भात सहानूभुती ठेवणारे देशात ही संख्या कमी नाही. त्यांच्या मतानुसार नक्षलवादाची समस्याही विधीविषयक समस्या आहे. त्याचा राजकीय, सामाजिक व्यवस्थेशी संबंध नाही. यात बुध्दीवादी लोक आघाडीवर आहेत. त्यांचे ज्ञान सत्य गोष्टीवर कमी व पुस्तकावर जास्त असते.अशी एक धारणा पडली आहे की, नक्षलवादी शोषकांच्या विरोधात लढत आहेत. परंतु वास्तव भिन्न आहे. वर्ग संघर्षाच्या पडद्यामागून लुटीचे काम करीत आहेत. स्थानिक आदिवासंना लहान-लहान गोष्टींना मदत करून, त्यांच्या बाजूने जनआदालती भरून त्यांचा विश्वास संपादन केला जातो. त्यांच्याच मदतीने जंगल, शेतीवर आपले वर्चस्व प्रस्थापित करत आले आहेत. त्यानंतर ठेकेदार, पदाधिकारी, रोड निर्माण करणा-या कंपन्या आदी कडून खंडणी वसूल केल्या जाते. लुटपाट सोपी व्हावी यासाठी एरिया व झोन निर्माण केले जातात. एका झोनची कमाई करोडोच्या घरात आहे. ही कमाई आदिवासींच्या विकासासाठी खर्च के ली जात नाही. आज नक्षलवाद्यांनी एक पैसाही आदिवासींच्या आरोग्य, शिक्षण व कल्याणावर खर्च केला नाही. त्यांच्या बेहिसेबी कमाईचा आर्धा हिस्सा आंध्र प्रदेश आणि बंगालमधील नक्षली नेत्यांना जातो.

नक्षलवाद्यांच्या नेतृत्वाखाली समाजातील वंचित घटक आपल्या हक्काची लढाई लढत आहेत. सामान्य माणसांना हे माहित नसते की, कोणत्याही झ ोनचे नेतृत्व आंध्र व बंगाल स्थित नक्षली नेता निश्चित करीत असतात. कोणत्याही झोनचे नेतृत्व करण्याची संधी स्थानिकांना दिली जात नाही, ते बाहेरील असतात. स्थानिक आदिवासींची भूमिका सहाय्यकाची किंवा नक्षलींची शस्त्रे लपविण्याची किंवा नक्षलीच्या जेवणाची व्यवस्था करण्याची किंवा नक्षलींना शारीरिक संबंध ठेवण्यासाठी तरूणींना पुरवण्याची असते. या कामाच्या मोबदल्यात १०० ते २०० रूपये दिले जातात किंवा जमीनदाराची काही जमीन दिल्या जाते. नक्षलवादी मोठे ऑपरेशन पूर्ण केल्यानंतर मोठया शहरात लपून बसत असतात. त्यामुळे पोलिस आदिवासीवरच अत्याचार करीत असतात.

जास्तीत जास्त लोक हे मानतात की नक्षलवाद ही राजकीय विचारसरणी आहे. त्यांनी आपला उद्देश प्राप्त करण्यासाठी हिंसेचा आधार घेतला आहे. पण हा भ्रम आहे, यांची विचारसरणी केवळ कागदावरच आहे. पाणी, जंगल संपत्तीची लढाई केवळ वरवर दाखविण्यासाठीच आहे. नक्षलींना खंडणी दिल्यास कितीही प्रमाणात जंगल तोडू देतात. पंचायत समितीपासून ते संसदेपर्यंत प्रत्यक निवडणूकीच्या अगोदर निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचे भास निर्माण करून व काही लहान लहान हिंसक घटना घडवून आणून आपली किमंत वाढवत असतात. जो उमेदवार जास्त किमंत देईल त्याला मतदान करण्याचा आदेश नक्षलवादी आदिवासींना देत असतात. मग तो उमेदवार कितीही अन्यायी व अत्याचारी असो किंवा शोषक असला तरी चालतो. नक्षली हिंसेच्या आकडयाचा विचार केल्यास त्यांनी किती भांडवलदारांना व उद्योगपतींना धडा शिकवला आहे. आपल्याला उत्तर निराशाचेच मिळेल. नक्षली नेहमी सामान्य ग्रामीण आदिवासी किंवा पोलिस सिपायांनाच ठार करत असतात.

या देशातील प्रत्येक व्यक्ति आदिवासीच्या हक्क व त्यांच्या आकांक्षाचे समर्थन करतो. आपल्या सरकारने त्याची उपेक्षा केली आहे. त्यांना विकासापासून वंचित ठेवले आहे. परंतु नक्षलवाद्यांना काय वाटते. आदिवासीचा विकास झाला पाहिजे? त्यांनी शासनाकडून निर्माण केलेले रस्ते, शाळा, शासकीय इमारती, पुल स्फोटकांनी उडवून दिले आहेत. त्यांनी अशी दहशत निर्माण करून ठेवली आहे की सरकारी कार्य करण्याची कोणी हिंमतच करणार नाही. आदिवासी सुशिक्षित झाल्यास आपल्या चळवळीला मणुष्यबळ कोठून मिळणार, समर्थन कोण देणार म्हणून आदिवासीच्या दूर्दशेस केवळ सरकारच जबाबदार नाही तर नक्षली देखील जबाबदार आहेत. या देशातील किडलेली आहे हे मान्य केले तरी नक्षलवाद्यांनी पर्यायी व्यवस्था ही सक्षम दिली नाही. त्यामुळेच भविष्यात या चळवळीचा विचार मागे पडत जाईल आणि त्यांच्याकडून होणार नृशंस हिंसाचार तेवढा लक्षात राहिल हे वास्तव सत्य आहे.आम्ही शोषित आणि पीडितांच्या बाजुने लढतो आहोत असा दावा करत सुरू झालेल्या नक्षल चळवळीमुळे काही प्रश्नात नक्कीच न्याय मिळाला आहे हे खरे आहे. भूसुधारणेचा कार्यक्रम अनेक राज्यात राबविण्यात आला तो या चळवळीने हा प्रश्न ऐरणीवर आणल्यामुळेच, विनोबा भावेच्या भूदान आंदोलनाची प्रेरणासुध्दा हेच आंदोलन आहे. नक्षल चळवळीमुळे सावकारी व जमीनदारी प्रथेवर बराच वचक निर्माण झाला. दुर्गमभागात वास्तव्यास असलेल्या, अन्याय अत्याचार सहन करणाऱ्या अतिदरिरद्री आणि मागास लोकांच्या प्रश्नांना या चळवळीमुळे वाचा फुटली, त्यांचे प्रश्न ऐरणीवर आले, सरकारला त्याची दखल घेणे भाग पडू लागले.

संदर्भ :-


१) मुद्राराक्षस, कालातीत, किताबघर प्रकाशन, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती , २००९
२) पोहरे प्रकाश, (संपा), नक्षलवादाचे पितृत्व सरकारकडेच !विदर्भ पब्लीकेशन, नागपूर,२०१०
३) श्रीवास्तव परमानंद, अतल का अन्तरीप, वाणी प्रकाशन, पटना (बिहार), प्रथम आवृत्ती, २०१४
४) शास्त्री विजय, हिंदू चर्मकार जाति, प्रभात प्रकाशन, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती, २०१४
५) गाथिया जोसेफ, मीडिया और सामाजिक बदलाव, कंसेप्ट पब्लीकेशन नवी दिल्ली, २००९
६) सक्सेना विवेक, नक्षली आतंकवाद, प्रभात प्रकाशन, नवी दिल्ली, २०१०
७) सिंह रमण (डॉ.), इन्सान बेमिसाल, प्रभात प्रकाशन, नवी दिल्ली, २०१६
८) कुमार अशोक, राजनीति विज्ञान, उपकार प्रकाशन, आगरा, २०१५
९) माळी प्रशांत, दै लोकसत्ता, दि. ०७.०२.२०१५
१०) गावंडे देवेंद्र,दै. लोकसत्ता, लोकरंग, दि.२८.०५.२०१७
११) दै. लोकसत्ता, १९.०६.२०१७
१२) दै. न्यूजहंट, हिंदी समाचार, २९.०५.२०१३
१३) दै. लोकसत्ता, २१.०३.२०१७